# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 27/04/2018 रोजी (का.प.क्र.27) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 27 एप्रिल 2018 रोजी (का.प.क्र.27) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-45 वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

चर्चा :

श्रीमती.संगिता वाघुले : माझ्या वार्डातील नाल्यावरचे अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. आता पर्यंत त्याची काहीच दक्षता घेण्यात आली नाही. आरतीनगर मिसरवाडी भागात नागरीकांच्या घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी गेले आहे. नागरीकांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. अतिक्रमण काढुन तिथे संरक्षण भिंत बांधण्यात यावी.

मा.सभापती : आताच स.सदस्यांनी सुचना केल्या नुसार त्या भागात लोकांच्या घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी गेले आहे, अतिक्रमण त्वरित काढण्याची कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.संगिता वाघुले : अतिक्रमण कधी काढणार आहे, ते सांगावे.

अति.आयुक्त : अतिक्रमण विभागाला तात्काळ मिटिंग संपल्यानंतर कारवाई करण्याचे आदेश देण्यात येईल.

श्रीमती.संगिता वाघुले : अतिक्रमण काढल्या नंतर लवकरात लवकर नाल्याची सरंक्षण भिंत बांधुन द्यावी.

मा.सभापती : प्रशासनाला आदेशित करण्यात येते कि, अतिक्रमण काढल्यानंतर संरक्षण भिंत बांधुन देणे बाबत कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : सर्वसाधारण सभेमध्ये मा.महापौरांनी आदेशित केले होते की, 7 ते 8 दिवसात सिडको-हडकोचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येईल आणि समान पाणी वाटप संदर्भात सुध्दा चर्चा झाली होती. वार्डामध्ये तिसऱ्या चौथ्या दिवशी पाणी येत आहे. याच्यामध्ये काय सुधारणा झाली? काय करणार आहे? आणि समान पाणी वाटपाच्या संदर्भात काय झाले? समान पाणी पुरवठ्या संदर्भात नियोजन पुर्ण शहरामध्ये करायला पाहिजे. फक्त सिडको-हडकोचाच टाईम चेंज का करण्यात आला? सर्वांना चौथ्या पाचव्या दिवशी पाणी करावे. असा अन्याय, भेदभाव का होत आहे? N-7 पाण्याची टाकी, हरसिध्दी पाण्याची टाकी आणि जेलची पाण्याची टाकी या तीन टाकीवरच चेंजस का करण्यात

आले? आमच्या वार्डातील नागरीक टॅक्स भरतात, पाणी पट्टी भरतात, मग त्यांच्यावर अन्याय का होतो.

श्री.रेणुकादास वैद्य : हा फक्त सिडको-हडकोचा प्रश्न नाही, पाण्याचा प्रश्न पुर्ण शहराचा आहे. माझ्या वार्डामध्ये मागच्या 3 आठवड्यापासुन पाणी पुरवठ्याची कुठलीही वेळ ठरलेली नाही. रोज 3-4 वाजेनतंर पाणी पुरवठा होत आहे. पाणी सोडुन सुध्दा लोकांना पाणी मिळत नाही. दोन-तीन टप्यासाठी पुर्ण शहर डिस्टप होत आहे. याचे नियोजन करण्यात यावे. त्या 2-3 टप्प्यासाठी पाणी उशिरा येत आहे.

श्रीमती.शेख नरगीस : नेहरु नगर, कट-कट गेट, रहेमानिया कॉलनी या भागामध्ये सात दिवसाआड पाणी येत आहे.

श्रीमती.राखी देसरडा : गादिया पार्कमध्ये आठव्या दिवशी पाणी आले. पाण्याची वेळ बदलण्यात यावी.

श्रीमती.संगिता वाघुले : आरतीनगर, मिसरवाडी भागात पाण्याची पाईप लाईन नाही. विहीरीचा गाळ काढण्यात यावा. ते जर केले तर तेथील पाणी वापरासाठी उपयोगात येईल.

श्रीमती.मनिषा मुंढे : वार्डातील 25 घरांना पाणी येत नाही. सुचना करुन ही दखल घेत नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पु): श्री.राजु वैद्य साहेबांनी प्रश्न उपस्थित केला आहे कि, 2-3 टप्यामुळे पाणी डिस्टप होत आहे. ते टप्पे पुढे किंवा मागे घेऊन पाणी पुरवठा सुरळित करु. श्री.राजु वानखेडे यांनी प्रश्न उपस्थित केला होता कि, आधी दोन दिवसाआड पाणी मिळत होते आता तीन दिवसाआड पाणी मिळत आहे. पावसाळ्याच्या दिवसात त्यांच्या वार्डामध्ये पाईप-लाईन टाकत होतो, त्यांना आधीच सांगितले होते कि,आपल्याला ते पाणी 3 दिवसाआड करावे लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे : माझ्याकडे वॉटर लाईन टाकल्यावर किती लाख लिटर पाणी बचत झाले?

कार्यकारी अभियंता(पा.पु): 5 लाख लीटर पाणी बचत झाले.

श्री.राजगौरव वानखेडे : 29 लाख लीटर पाणी बचत होते. ते पाणी हर्सुल भागात दिले, बाजुच्या वार्डातील नॅशनल कॉलनीला पाणी दिले. कमीत कमी हजारच्या आसपास कनेक्शन इलिगल होते. मागील 10 वर्षापासुन पाणी पुरवठा विभागाला इलिगल कनेक्शन कट करता आले नाही. सिडको-हडको भागात पाणी पुरवठा सुरळित होणार आहे की नाही ते स्पष्ट करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता(पा.पु): जायकवाडी येथुन जे पाणी लिप्ट करतो ते पंपाच्या ठिकाणी गाळ आहे ते, काढण्यासाठी मुंबई येथुन मशीन मागविली आहे ते काम झाल्यानंतर पूर्वी जसे 2 दिवसाआड पाणी होते त्याप्रमाणे जेलची टाकी, N-7 टाकी आणि हरसिध्दी टाकी या ठिकाणी पाणीपुरवठा करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. आणि 5 MLD पाण्याची मागणी MIDC कडे केलेली आहे. ते पाणी मिळाले तर सुरळीत पाणी पुरवठा करता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे : तिसऱ्या दिवशी पाणी देत होतो तेव्हा 45 मिनिटे पाणी येत होते आणि आता 4-5 दिवसानंतर पाणी देत आहोत तरी सुध्दा 45 मिनिटे पाणी येत आहे. पाण्याची वेळ वाढवली पाहिजे कमीत कमी 1 तास तरी केले पाहिजे.

कार्यकारी अभियंता(पा.पु) : पाणी जास्त देण्याची वेळ पडताळून घेतो. जास्तीत जास्त वेळ पाणी देण्याचे नियोजन करतो.

श्रीमती.शेख नरगीस : old city मध्ये सातव्या दिवशी पाणी येत आहे.

श्री.ऋषिकेश खैरे : गुलमंडी भागामध्ये आठ दिवसापासुन पाणी येत नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पु): क्रांतीचौकवरुन शहागंजच्या टाकीची पाईप लाईन आहे. त्यावरुन 300 ते 400 कनेक्शन आहेत त्यांना 24 तास पाणी मिळते.

श्री.ऋषिकेश खैरे : समर्थनगर, औरंगपुरा भागात एका दिवसाचे शेड्युल आहे. कमीत कमी 2 महिन्यापासुन पाण्याचा प्रेशर कमी येत आहे असे सांगण्यात आले. माहिती काढल्यावर पाण्याच्या टँकरची चोरी होत आहे त्यामुळे पाणी कमी येते.

मा.सभापती : खाजगी टँकरने पाणी पुरवठा करतात असे स.सदस्यांचे आरोप आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पु) : टँकर भरतो तेथे सी.सी.टीव्ही बसवण्यात आलेला आहे, टँकरवर GPS सिस्टीम बसवण्यात आले आहे आणि जे कोणी चोरी करत असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती : किती खाजगी टँकरने परवानगी घेतलेली आहे?

कार्यकारी अभियंता(पा.पु) : पुर्ण 67 टँकर चालु आहे. खाजगी टँकर महानगरपालिके तर्फे चालु आहे.

श्रीमती.राखी देसरडा : गादीया पार्कमध्ये नेहमी 8 ते 10 दिवसाआड पाणी येते. फोन केला तर फोन उचलत नाही. पाण्याची वेळ निश्चित केलेली नाही.

मा.सभापती : गादिया पार्कमध्ये जाऊन पाण्याचा प्रॉब्लम सॉल करण्यात यावा. श्री.चहल यांना सुचना करण्यात येते की, स.नगरसेवकांनी पाण्यासंदर्भात जे विषय मांडले आहेत त्याची पाहणी करुन सोडवण्यात यावे.

श्री.सय्यद मतीन : सिटी चौक ते शहागंजमधील हातगाड्या आणि चमन जवळील दुकानांवर मालमत्ता आणि अतिक्रमण विभागाकडुन कारवाई करण्यात आली. दिवाळी, दसरा, रमजान मध्ये हातगाड्यांना परवानगी दिली जाते. स्थानिक लोकप्रति निधी येण्या आधी कधीच अडचण आली नाही. 3 वर्षानंतर ही अडचण येत आहे. सुप्रीम कोर्टच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने यामध्ये आदेशाची कॉपी आहे सगळे नियम याच्यामध्ये आहे. रमजानमध्ये हातगाड्यांना परवानगी देण्यात यावी.

मा.सभापती : पाहणी करुन रमजान मध्ये दरवर्षी प्रमाणे व्यापार करण्याची हातगाड्यांना परवानगी दिली जाते त्या प्रमाणे परवानगी दिली जावी. याकरिता याची पाहणी करुन योग्य ठिकाणी जागा देण्यात यावी.

श्री.सय्यद मतीन : चमन जवळ जी दुकाने आहेत त्यावर श्री.वामन कांबळे यांनी कारवाई केली. लोकांकडे 2017 पासुनची परमीशन आहे, कोणत्या नियमाने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. न्याय पालिकेच्या आदेशाचे पालन करत नाहीत.

मालमत्ता अधिकारी : शहागंज चमन जवळील टपऱ्यांना सुचना देण्यासाठी गेलो होतो. त्यांच्याकडे परवानगी नाही. मा.उच्च न्यायालयाने 2000 मध्ये आदेश दिलेले आहे कि, 9 मीटर ते 45 मिटर रस्त्यावरील सर्व टपऱ्या हटवण्यात याव्या. टाऊन प्लॉनिंगने मार्किंग करुन कारवाई केलेली आहे.

मा.सभापती : मा.कोर्टाची माहिती विधी सल्लागारांकडुन घ्यावी. योग्य प्रकारे चर्चा करुन कारवाई करावी.

श्री.सय्यद मतीन : विवेकानंद कॉलेज च्या बाजुला मनपाची जागा आहे त्या संबंधी एक पत्र दिला होते, त्यामध्ये परवानगी केव्हा पासुनची आहे करार झालेला आहे का नाही. यांचे म्हणणे आहे की त्याची परवानगी नव्हती. मॅटर न्याय पालिकेमध्ये आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : कॉलेजची जागा भाडे तत्वावर दिलेली आहे का?

मालमत्ता अधिकारी : स.सदस्य श्री.मतीन यांनी पत्र दिले होते. प्रस्ताव सादर करण्यात आले.

श्री.सय्यद मतीन : तेथे 5,536 स्वे मी. महानगरपालिकेची जागा आहे. विवेकानंद कॉलेजसाठी किती जागा दिली गेली? याचे उत्तर दिलेले नाही. किती वर्षापासुन जागा वापरण्यात येत आहे? आणि मराठा शिक्षण संस्थेला ती जागा देण्यात आली आहे. करार झालेले नाही तर कोणत्या कारणाने मॅटर मा.कोर्टामध्ये गेले?

श्री.राजगौरव वानखेडे : शहरामध्ये अशा किती मनपाच्या जागा आहेत त्याचा करार झालेला नाही? एखाद्या संस्थेवर कारवाई करण्याआगोदर संपूर्ण शहरात महानगरपालिकेच्या किती जागा आहेत याची सविस्तर माहिती सभेमध्ये ठेवण्यात यावी.

मा.सभापती : स.सदस्यांनी ज्या प्रकारे प्रश्न उपस्थित केले आदेशित करण्यात येते की, ती जागा केव्हा पासुन भाडे तत्वावर जागा दिलेली आहे, मुदत कधी संपणार, योग्य ती माहिती घ्यावी. लिगल विभागाकडुन मा.कोर्टातील प्रकरणाची माहिती घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे : चिखलठाणा ते नगर नाका आणि काही औरंगपुऱ्यातील भागातील होर्डिंगचे फोटो काढुन आणलेले आहे. काही होर्डिंगवर बॅच लावलेले होते नंबर दिलेले होते आणि यामध्ये सगळयात जास्त बिगर नंबरचे होर्डिंग दिसुल आले आहे. बॅच लावलेले होर्डिंग 50 असतील परंतु अनाधिकृत होर्डिंग शंभरच्यावर होते. होर्डिंगच्या संदर्भामध्ये मनपाचा करारनामा झालेला आहे का?

मालमत्ता अधिकारी : जे काही अनाधिकृत होर्डिंग आहेत त्याचा सर्वे करुन त्यांना नोटिस दिलेली आहे. पेट्रोलपंपाच्या 26 होर्डिंग अनाधिकृत आणि सातारा देवळाईमध्ये 19 होर्डिंग अनाधिकृत आहे. ज्या होर्डिंगवर नंबर प्लेट नाहीत त्यावर कारवाई प्रस्तावित करुन मा.आयुक्तांची मान्यता घेऊन कारवाई करणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : याच्यामध्ये जर व्यवस्थित सर्वेक्षण केले तर 26 च्या ठिकाणी 200 च्या वर फक्त अनाधिकृत होर्डिंग आहेत. मध्यंतरी होर्डिंगच्या संदर्भामध्ये अभय योजना राबविली होती का? त्याच्यामध्ये किती लिगल करण्यात आले? आणि त्याच्यामध्ये किती पैसे भरुन घेतले?

मालमत्ता अधिकारी : 2017 मध्ये अभय योजना राबवली होती. यामध्ये 95 होर्डिंग लिगल करण्यात आले होते आणि यामध्ये 43 लक्ष भरुन घेतले आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे : अभय योजना राबवण्यात याव्या म्हणुन सर्वसाधारण सभेमध्ये ठराव झाला होता का?

मालमत्ता अधिकारी : 2016 मध्ये ठराव झाला होता.

श्री.राजगौरवन वानखेडे : ज्या 95 होर्डिग अभययोजने मध्ये केले त्यांना बॅच लावले का? त्यांना नंबर टाकले का?

मालमत्ता अधिकारी : सगळ्यांना सुचना देण्यात आली पत्र काढण्यात आले आहे.

मा.सभापती : ज्या अनाधिकृत होर्डिंगस् असतील त्या त्वरित काढण्यात याव्या.

श्री.राजगौरव वानखेडे : आदेशीत करावे कि, किती होर्डिंग अनाधिकृत आहे आणि किती अधिकृत आहे? येणाऱ्या बैठकीमध्ये सविस्तर खुलासा देण्यात यावा आणि याची यादी 30 तारखेपर्यंत देण्यात यावी.

मा्.सभापती : सुचित करण्यात येते की, याची सर्व माहिती पुढच्या बैठकीपर्यंत देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : जेटींग मशिन विषयी मागच्या बैठकीत चर्चा केली होती. त्या बाबत मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.सभापती : याची प्रशासनाने दखल घ्यावी. मा.अति आयुक्त यामध्ये खुलासा करतील.

अति.आयुक्त : जेटींग मशिन बाबत मा.आयुक्तांसोबत चर्चा झालेली आहे. लेखा विभागाला याच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे सांगितले आहे.

श्रीमती.संगिता वाघुले : फवारणीसाठी फोन केला तर श्री.मोरे म्हणुन कर्मचारी आहेत ते उडवा उडवीचे उत्तरे देत असतात. त्यांची बदली करण्यात यावी.

श्री.सय्यद मतीन : हा पूर्ण शहराचा प्रश्न आहे, याच्यावर कारवाई का करत नाही? जे कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई करावी.

मा.सभापती : जो कोणी कर्मचारी आहे त्यांच्या जागी दुसरा कर्मचारी पाठवावा आणि योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. 379 : (शिक्षण विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची सिडको एन-7 येथे माध्यमिक शाळा आहे. या शाळेची इमारत मोडकळीस आली असून Structural Audit मध्ये इमारत धोकादायक दाखवली आहे. शाळेची इमारत पाडून बांधणे आवश्यक आहे. फोर्ब्स कंपनी लि. ही कंपनी स्वतःच्या सी.एस.आर. या

फंडातून सिडको एन-7 शाळा इमारत टप्याटप्याने 03 वर्षात पूर्ण बांधुन देण्यास तयार आहे. दरवर्षी सरासरी 40 ते 50 लाखांचे बांधकाम होईल. बांधकामाचा होणारा एकूण 100% खर्च कंपनी करण्यास तयार आहे.

तरी सद्यस्थितीत असलेली शाळेची इमारत महानगरपालिकेने जमीनदोस्त करून (पाडुन) देण्यात यावी जेणेकरून नवीन बांधकाम करणे सोयीस्कर व तात्काळ होईल.

प्रस्ताव महानगरपालिकेच्या हिताचा असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| श्री.राजगौरव वानखेडे | : काही संस्था आहे, शाळा आहे ते भाडेतत्वावर दिलेले आहेत त्याच्यामध्ये N-7 ची शाळा आहे का? |
| मा.सभापती | : याबाबत माहिती द्यावी. |
| शिक्षणाधिकारी | : N-7 ची शाळा भाड्यावर दिलेली नाही. ती शाळा 1972 साली बांधलेली आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : N-6 ची शाळा जी भाडेतत्वावर दिलेली आहे ती कोणाला दिली? |
| शिक्षणाधिकारी | : याची कारवाई मालमत्ता विभागाने केलेली आहे. मी येण्यापूर्वी ही कारवाई झालेली आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : ॲग्रीमेंट कोणी केलेले आहे? |
| शिक्षणाधिकारी | : मालमत्ता विभागाने ॲग्रीमेंट केलेले आहे. |
| मालमत्ता अधिकारी | : Sai Solution Education Trust यांना दिलेली आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : त्या Agreiment मध्ये असे लिहिलेल आहे का कि, कोणी Contruction करु नये. जागा कोणी वापरायला पाहिजे, असे काही अधिकार संस्थेला दिले आहे का? |
| मालमत्ता अधिकारी | : महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. ॲग्रीमेंटमध्ये कुठलेही Structure बदलता येणार नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : त्याच्यामध्ये जर Structure बदल केला तर करार रद्द करुन शकतो. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : संस्थेने दिलेल्या करारनामा प्रमाणे काम केले नसेल तर तातडीने हा करार रद्द करण्यात यावा. |
| मा.सभापती | : स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला याची स्वतः पाहणी करा आणि त्याच्यात काही बदल झाले असेल तर त्याची माहिती सभागृहात द्यावी योग्य ती कारवाई करावी. प्रशासनाला आदेशित करण्यात येते की, त्याची माहिती घेऊन 30 तारखेच्या आत देण्यात यावी. विषय क्र.379 मंजुर करण्यांत येतो. तसेच मागील सभेत अनावधनाने विषय क्र.376,377 व 378 हे क्रमांक अनावधानाने सुटलेले आहे, याची कृपया नोंद घ्यावी. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची सिडको एन-7 येथे माध्यमिक या शाळेची इमारत मोडकळीस आली असून Structural Audit मध्ये इमारत धोकादायक दाखवली असल्यामुळे, शाळेची इमारत पाडून बांधणे आवश्यक असल्याने तसेच फोर्ब्स कंपनी लि. ही कंपनी स्वतःच्या सी.एस.आर. या फंडातून सिडको एन-7 शाळा इमारत टप्याटप्याने 03 वर्षात पूर्ण बांधुन देण्यास तयार असल्याने दरवर्षी सरासरी 40 ते 50 लाखांचे बांधकाम व बांधकामाचा होणारा एकूण 100% खर्च कंपनी करण्यास तयार असल्यामुळे,सद्यस्थितीत असलेली शाळेची इमारत महानगरपालिकेने जमीनदोस्त करून (पाडुन) देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 380 : (कार्य.अभि. पा.पु.)</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर समांतर जलवाहिनी प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत होता. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. (कन्सेशनर) यांनी प्रकल्पामध्ये अनेक अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेने दिनांक 01.10.2016 रोजी संबंधीतांना

Terminate केले आहे. तेंव्हा पासुन पाणी पुरवठा विषयक सर्व कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

- कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/उअ (जायां)/211 दिनांक 07.10.2016 नुसार सातारा-देवळाई परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेल्या भाडेतत्वावरील वॉटर टँकरचे दर खालील प्रमाणे आहे.

| 1 मे.टन | |
|---|---|
| प्रति दिन भाडे | प्रति किमी भाडे |
| रु. 175/- (रुपये एकशे पंच्याहत्तर) | रु. 2.30 (दोन रुपये तीस पैसे) |

- औरंगाबाद शहरातील विविध भागातील नागरीकांना पाणी वितरणासाठी भाडेतत्वावर टँकर लावणेसाठी नियमीतपणे 8 वी वेळेस व अटी व शर्तीमध्ये बदल करून 2 री वेळेस निविदा मागविली असता 4 निविदा प्राप्त झाल्या. तांत्रिक बिड उघडल्यानंतर 1 निविदाकार पात्र झाले.

(त्यापैकी पात्र निविदाधारक मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची माहिती खालीलप्रमाणे)

| अ.क्र. | सद्याचे टँकरचे दर ज्यावर पाणी पुरवठा सुरू आहे. | | | 1 मे. टन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षमता | प्रति दिन भाडे रू. | प्रति कि.मी. रू. | निविदेद्वारा आलेले नविन दर | | वाटाघाटीअंती प्रस्तावित दर | |
| | | | | प्रति दिन भाडे रू. | प्रति किमी रू. | प्रति दिन भाडे रू. | प्रति किमी रू. |
| 1. | 5000 लि. | 175 | 2.30 | 249/- रू.दोनशे एकोनपन्नास | 3.25 तीन रूपये पंचवीस पैसे फक्त | 205 रू.दोनशे पाच फक्त | 3.00 रू.तीन फक्त |
| | 10000 लि. | 175 | 2.30 | 200/- रू.दोनशे फक्त | 2.49 दोन रूपये एकोनपन्नास पैसे फक्त | 190 रू.एकशे नव्वद फक्त | 2.30 दोन रू. तीस पैसे फक्त |

* वरील निविदाकाराची निविदा स्थायी समिती ठराव क्र.290 दि.07/02/2018 (का.प.क्र.18) अन्वये वरीलप्रमाणे मंजुर करण्यात आली.

**दररोज साधारणपणे टँकरसाठी येणारा खर्च**

| **अ.क्र** | **क्षमता** | **सरासरी रनिंग किमी** | **मनपा दर** | **जिल्हाधिकारी कार्यालय** | **औरंगाबाद वॉटर युटिलिटी** | **सातारा देवळाई** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5000 लि. | 80 किमी | रु.3146/- | रु.(740+720) = 1460/- | रु.(350x8) 2800/- | रु.(875+920) = 1795/- |
| 2 | 10000 लि. | 60 किमी | रु.3899/- | रु.(1480+1080) = रु.2560/- | रु.(720x5) रु.3600/- | रु.(1750+1380) = 3130/- |

पाणी पुरवठ्याचे सोबतच्या तक्यात तुलनात्मक दर पाहता सातारा देवळाईचे कंत्राटदाराकडून हे काम करुन घेणे महानगरपालिकेच्या हिताचे होते. त्यामुळे कामाची तातडी पाहता महाराष्ट्र महानगरपालिकेचे अधिनियम कलम 67 (3) (क) मध्ये मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद हे अगोदर पासुन महानगरपालिकेत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणारे ठेकेदार असून, त्यांना हे काम देण्यात आले आहे. ही पर्यायी व्यवस्था निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून, Stop-Gap Arrangement आहे. शहरासाठी काढण्यात आलेली निविदा अंतिम होई पर्यंत हे काम त्यांना मा.आयुक्त यांची मंजुरी घेऊन या कार्यालयाचे आदेश क्र. मनपा/काअ/पापु/2017/40

दि.04.02.2017 अन्वये देण्यात आलेले आहे. मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची निविदा अंतिम होऊन दि.09/02/2018 रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहे. दि.01/09/2017 ते 08/02/2018 पर्यंत झालेल्या कामाचे देयक कंत्राटदारास खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कालावधी | टँकरची संख्या | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| 01. | 01/09/2017 ते 30/09/2017 | 74 | 3339398 |
| 02. | 01/10/2017 ते 31/10/2017 | 70 | 3224187 |
| 03. | 01/11/2017 ते 30/11/2017 | 67 | 3181726 |
| 04. | 01/12/2017 ते 31/12/2017 | 70 | 3431134 |
| 05. | 01/01/2018 ते 31/01/2018 | 69 | 3414943 |
| 06. | 01/02/2018 ते 08/02/2018 | 66 | 880308 |

आपले अवलोकनार्थ तथा कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.380 याबाबत सभागृहात माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता(पा.पु): सातारा देवळाईचे जे रेट होते त्याच रेटने सिटीच्या टँकरला पेमेंट केलेले आहे. त्याला कार्योत्तर मान्यता द्यावी त्यासाठी आहे.

श्री.राजु वैद्य : सातारा देवळाईचे जे रेट दिलेला आहे 3130 आणि 1775 हा तक्ता काय आहे?

कार्यकारी अभियंता(पा.पु) : सातारा देवळाईचे जे रेट आहे तो 1775 रुपये पर टँकरचा रेट आहे आणि 2 रु 30 पैसे पर किलो मीटर आहे.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी टँकरमार्फत शहरात दि.01/09/2017 ते 08/02/2018 पर्यंत केलेल्या पाणी पुरवठ्याचे खालीलप्रमाणे देयकास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते.

| अ.क्र. | कालावधी | टँकरची संख्या | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| 01. | 01/09/2017 ते 30/09/2017 | 74 | 3339398 |
| 02. | 01/10/2017 ते 31/10/2017 | 70 | 3224187 |
| 03. | 01/11/2017 ते 30/11/2017 | 67 | 3181726 |
| 04. | 01/12/2017 ते 31/12/2017 | 70 | 3431134 |
| 05. | 01/01/2018 ते 31/01/2018 | 69 | 3414943 |
| 06. | 01/02/2018 ते 08/02/2018 | 66 | 880308 |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>चर्चा :</u>

श्री.सिताराम सुरे : N-12, डॉ.सलिम अली सरोवर येथील एसटीपी प्लॅन येथे बोर आहे. वार्डातील काही कॉलन्यामध्ये पाईप लाईन नसल्यामुळे नागरिकांची वारंवार मागणी आहे कि, कमीत कमी वापरण्यासाठी पाणी उपलब्ध करुन द्यावे. बोरवरुन पाणी देण्याबाबत पत्र दिले आहे आणि याचा जो खर्च असेल तो मी स्वतः करेल. हे पाणी वापरण्यासाठी वार्डातील काही भागांमध्ये मे आणि जुन या दोन महिन्याकरिता पाहिजे. टँकरचा, पाण्याचा खर्च मी देण्यासाठी तयार आहे. याचा कोणताच भार महानगरपालिकेवर पडु देणार नाही. पाण्याचे टँकर देता येतील का?

मा.सभापती : स.सदस्य श्री.सीताराम सुरे यांनी पत्र देऊन विनंती केली आहे की, वॉर्ड क्र.08 सुरेवाडी अंतर्गत विविध कॉलन्यामध्ये जलवाहीनी नसल्यामुळे, वॉर्डातील नागरीकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यांना धुणे, भांडी करणेसाठी पाणी नसल्यामुळे, डॉ.सलीम

अली सरोवर येथील (STP) ला लागून असलेल्या बोअरवरून टँकर भरून देण्यात यावे. हे पाणी वॉर्डातील नागरीकांना धुणे, भांड्यासाठी वापरण्यास देण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांनी स्वतःचे टँकर सुरू केलेले आहे. (टँकर क्र.MH 20 EG 5143) त्यांना टँकर भरण्याची परवानगी देण्यांत येते, यास मंजुरी देण्यांत येते.

श्री.रेणुकादास वैद्य : सलिम अली सरोवराजवळ मच्छी व्यवसाय करणारे काही मंडळी आहेत. न्यायालयामध्ये प्रकरण चालु होते म्हणुन त्याच्यावर काही निर्णय घेत नव्हतो. त्या लोकांनी कंत्राट घेतलेले होते. परंतु हे प्रकरण मा.न्यायालयात असल्यामुळे प्रशासनाच्या वतीने त्याच्यावर कारवाई करता येत नव्हती. मा.न्यायालयाचे डायरेक्शन असे होते की, बाय डायरेक्शन डिस्टप न करता जी कारवाई करायची आहे ती मनपाने करावी. नियमानुसार करता येऊ शकते. त्यांना मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यास हरकत नाही.

मा.सभापती : मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन त्यांना योग्य ती परवानगी देण्यात यावी अशा प्रकारचे आदेश देण्यात येते. तसेच शहरातील उड्डानपुलावरील जाहिराती लावण्याबाबतचा विषय आलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : याच्यामध्ये एस.के. ॲडोटायजिंग या एजन्सीला ज्या पाच उड्डानपुला संदर्भामध्ये ज्या काही उड्डानपुलावरील होर्डींग्स असतील, जाहिराती असतील, त्यांना देण्यात यावी. जे काही रेट असतील, ते पुर्ण चार्जेस भरायला तयार आहेत. शहराच्या विकासाच्या संदर्भामध्ये उड्डानपुलाखालील जी जागा आहे ती ते स्वतः सुशोभित करून देणार आहे. त्यांचा हा विनंती अर्ज मंजुर करावा आणि त्यांना शहरातील उड्डानपुलावर होर्डींग्स लावण्याची परवानगी द्यावी.

मा.सभापती : पाच उड्डाण पुलावर जाहिरात लावण्याची परवानगी मागितलेली आहे, उड्डाणपुलासाठी असलेल्या अटी शर्ती लक्षात घेऊन व नियमानुसार जे रेट असतील, ते आकारण्यात यावे, यास मंजूरी देण्यात येते. तसेच आज दिनांक 27/04/2018 रोजी (का.प.क्र.27) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत याच सभेत कायम करण्यासही मंजुरी देण्यांत येते.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद